# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०५.०९.२०२६ शनिवार**

**विद्यार्थ्यांची फसवणूक करून बनावट कागदपत्रांच्या आधारे अल्पसंख्याक (भाषीक) प्रर्वगातून प्रवेश मिळवुन दिल्याप्रकरणी सल्लागार व कॉलेज स्टॉफ वर गुन्हा दाखल :**

शैक्षणिक अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा प्रवेश प्रकियेदरम्याण विद्यार्थ्यांची फसवणुक करून त्यांच्या सम्मतीशिवाय पुर्ण माहिती न देता अल्पसंख्याक (भाषीक) प्रवर्गातुन प्रवेश प्रक्रिया केल्याप्रकरणी संबधीत सल्लागारांविरूध्द आर्थिक गुन्हेशाखा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक चौकशी असे निष्पन्न झाले आहे की, संबधीत सल्लागाराने प्रवेश घेवु इच्छिणारे विद्यार्थ्यांकडुन कागदपत्रे स्वत:कडे घेवुन व त्यांच्या मुळ कागदपत्रात फेरफार करून त्यांचेकडुन ओ.टी.पी प्राप्त करून त्यांचेवतीने प्रवेश अर्जातील माहीती स्वत: भरली. विद्यार्थ्यांना त्यांचा अर्जामध्ये अल्पसंख्यांक प्रवर्गाची निवड करण्यात आल्याची पुर्ण माहीती नसतांना त्याच आधारे प्रवेश प्रक्रिया पुढे नेण्यात आल्याचे चौकशीत समोर आले आहे.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा पडताळणी नंतर संबधीत प्राधिकरणाचा निदर्शनास काही प्रवेशांमध्ये शाळा सोडल्यांचे दाखले/प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रांबाबत अनियमितता व बनावटपणाचे प्रकार संबधीत कागदपत्रावरून दिसुन आल्याने संबधीत विभागाकडुन विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची कारवाई करण्यात आली होती.

**दोन स्वतंत्र गुन्हे नोंद :**

अभिंयात्रिकी महाविद्यालयातील प्रवेश मिळवुन देण्याचे नावाखाली विद्यार्थ्यांकडुन मोठया रकमा घेणे, प्रवेश प्रक्रियेत अनियमितता करणे तसेच बनावट कागदपत्रांचा वापर केल्याच्या आरोपावरून नागपुर शहर पोलीसांनी दोन स्वतंत्र प्रकरणात गुन्हे दाखल केलेले आहेत.

पहिल्या प्रकरणात **एम.आय.डी.सी पोलीस ठाणे** गुन्हा क्रमांक ९०२/२०२६ कलम ३१८(४),३१६(२), ३१६(५),३३६(२),३३६(३),३३६(४),३३९,३४०,३(५) भा.न्या.सं. सहकलम ६६ (सि) अन्वये माहीती तंत्रज्ञान कायदा नुसार दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार अभियांत्रिकी प्रवेशासाठी सल्लागार मार्फत विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्यात आला. प्रवेशांचा प्रक्रियेसाठी तक्रारदारांकडुन टप्प्या–टप्प्याने रक्कम स्विकारण्यात आली आहे. तक्रारीत एकुण रू. २,५०,०००/– लाखांचा आर्थिक व्यवहार केलेला आहे. प्रवेशासाठी सादर करण्यात आलेल्या शैक्षणिक कागदपत्रामधील टि.सी. मध्ये मातृभाषेचा नोंदी संदर्भात अनियमतता झाल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यावरून, संबधीत प्रकरणाची माहीती डि.टी.ई व ॲडमिशन रेग्युलेटिंग ॲथोरिटी (ARA) विभागाकडुन घेण्यात आली आहे.

या प्रकरणात शिवम निंबाळकर तसेच संबधीत महाविद्यालयातील इतर स्टाफ विरूध्द गुन्हा नोद करण्यात आला आहे.

दुसरे प्रकरणात **नंदनवन पोलीस ठाणे येथे** अप क्रमांक ३९३/२०२६ कलम ३१८(४),३१६(२), ३१६(५),३३६(२),३३६(३),३३६(४),३३९,३४०,३(५) भा.न्या.सं. सहकलम ६६ (सि) अन्वये माहीती तंत्रज्ञान

कायदा प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणात अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळुन देण्याचा नावाखाली सल्लागार मार्फत विद्यार्थांचा पालकांकडुन रक्कम स्विकारण्यात येवुन विद्यार्थांचे सिईटी पोर्टलवर तसेच प्रवेशासाठी सादर करण्यात आलेंल्या शैक्षणिक कागदपत्रामधील टि.सी मध्ये मातृभाषेच्या नोंदीसंदर्भात अनियमतता झाल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यावरून संबधीत प्रकरणाची माहीती डि.टी. ई व अॅडमिशन रॅगुलेटिंग अॅथोरिटी कडुन घेण्यात आली आहे.

आरोपी नामे :— **पंकज धरवाल यास अटक करण्यात आली आहे**.

वृषभ धोटे व शितल धिर व इतर महाविद्यालय स्टाफ यांचेविरूध्द गुन्हा नोद करण्यात आला आहे.

तपास :— दोन्ही प्रकरणांमध्ये अभियांत्रिकी प्रवेश सल्लागार मार्फत आर्थिक व्यवहार व प्रवेशासाठी वापरण्यात आलेल्या कागदपत्रांची सत्यता हे तपासाचे प्रमुख मुद्दे आहेत. दोन्ही गुन्हयात पिडीत विद्यार्थांचे बयाण घेणे सुरू आहे. तसेच तपासात निष्पन्न होणाऱ्या पुराव्यांचे आधारे संबधीत व्यक्तीची भुमीका निश्चीत करण्यात येणार आहे. नमुद गुन्हयाचा तपास हा मा. पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हेशाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अरूण क्षिरसागर हे तपास करीत आहेत.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी रोशनसिंग शैलेषसिंग ठाकूर वय ३९ वर्षे, रा. प्लॉट क्र. १०५, वृंदावन कॉलनी, काटोल रोड, नागपूर हे प्रापर्टी डिलर असून पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्यीत गिट्टीखदान चौक, सुप्रिया बिल्डींग, पहिला माळा, शॉप क्र. २ येथे हॅप्पी डिम्स् नावाने प्रापर्टी खरेदी—विक्रीचे कार्यालय आहे. फिर्यादी यांचे कार्यालयात ओजस्पिनी विशाल काटे उर्फ ओजस्विनी संजय मेंढे वय २५ वर्ष रा. गुलामनबी आजाद शाळेजवळ, बोरगाव, गिट्टीखदान ही अॅडमीन म्हणून काम पाहते. दिनांक ०४.१२.२०२४ ते १३.०५.२०२६ दरम्यान, नमुद अॅडमीन हिने ऑफीसमध्ये प्लॉट खरेदी केलेल्या ग्राहकांकडून येणारी रक्कम स्विकारली तसेच आवक रजिस्टरला कमी रकमेच्या नोंदी केल्या व ग्राहकांकडून येणाऱ्या काही रकमांची नोंद न करता, ग्राहकांना देण्यात येणाऱ्या पावत्यांमध्ये व अनुक्रमांकामध्ये फेरफार व खोडातोड केली. तसेच संगणकात सुदधा छेडछाड केली. आरोपी हिने एकुण १५,८५,२३०/— रु. ची अफरातफर करुन फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. रामेश्वर जाधव ७३८७३२२९५१ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे भांडेवाडी :— घरफोडी करुन जाळपोळ करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे भांडेवाडी हद्यीत प्लॉट क्र. ३३, पवनशक्ती नगर, कचरा डम्पींग यार्डजवळ, भांडेवाडी येथे राहणारे फिर्यादी सुरेश रामभाऊ रोकडे वय ५१ वर्षे हे ट्रान्सपोर्ट व्यवसायी असुन दिनांक ०४.०.२०२६ चे १९. ३० वा. चे सुमारास ते आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मोठे भावाचे घरी खापा, सावनेर येथे कार्यक्रमाकरीता गेले होते. दिनांक ०५.०९.२०२६ चे ०५.२० वा. चे सुमारास, त्यांना घराशेजारी राहणारे यांनी फोन करुन घराला आग लागल्याची माहिति दिली. फिर्यादी हे घरी आले असता, फायर ब्रिगेडचे मदतीने आग विझवण्यात आली. फिर्यादी यांनी पाहणी केली असता, त्यांचे घरातील वाहनांची कागदपत्रे, एलईडी टिव्ही, आलमारी, दिवाण, धान्य, फ्रिज इत्यादी साहित्य जळाल्याचे दिसले. तसेच घरातील आलमारीतील सोन्याचे वेगवेगळ दागिने व पत्नीला मिळालेली भिसीची रक्कम रोख १,८५,०००/— असा एकूण २,८१,०००/— रु. चा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याचे दिसुन आले. अज्ञात आरोपीने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य

दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, आलमारीतील दागिने व रोख रक्कम चोरी कंली तसेच घराला आग लावून जाळपोळ करुन घरगुती साहित्याचे नुकसान केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे पोउपनि. निलेश कुलसुंगे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(८),३३१(४),३२४(४),३२६(ग) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे नवीन कामठी :—** दिनांक ०३.०९.२०२६ चे २१.०० ते ०४.०९.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, रमा नगर, कामठी, रेल्वे पोल क्र. १११७/११ ते १३ दरम्यान, पटरीचे मधोमध एक अनोळखी इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयोगटाचे रेल्वे ची धडक लागुन दोन्ही हायपाय कटल्याने मृत अवस्थेत मिळुन आले. मृतकाचे शव पुढील कार्यवाहीस्तव उपजिल्हा रुग्णालय कामठी येथे पाठविण्यात आले आहे. मृतक इसमाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. अक्षय झगडे ७०३८८४९०१४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे पारडी:—** सौ. आंचल विनोद सौंधिया वय २० वर्षे, रा. गाव फोकलशी जि. माडगंज मध्यप्रदेश ह. मु. कापसी बुद्रुक ग्रामपंचायत, पारडी, नागपूर हया दिनांक १८.०८.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट २ इंच, केस—काळे, अंगात—लाल रंगाची साडी घातलेली आहे. भाषा— हिंदी बोलतात.



सौ. आंचल

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३८३५/ २०१६ | कलम ४२० भा.दं.वि. | भोजराज सखाराम धाडवे रा. केटीपीएस कॉलनी, कोराडी ह. मु. प्लॉट क्र. ४, आर्यनगर, दहीकरचे घरी किरायाने, साई किराणाजवळ, नागपुर | ०९.०९.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**वाहतुक शाखा प्रेसनोट**

वाहतूक परिमंडळ कामठी अंतर्गत, कल्पतरू प्रोजेक्ट्स इंटरनॅशनल लिमिटेड तर्फे ऑटोमोटिव्ह स्टेशन ते कन्हान नदी पर्यंत मेट्रो व्हायडक्टचे बांधकाम सुरू असुन जयस्तंभ चौक येथे 2CP316 ते 2P320 पर्यंत दुभाजक बंद करून नमुद काम करण्यात येणार आहे. करीता नमुद कामाकरीता वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता कामठी रेल्वे स्टेशन कडुन गोयल टॉकीज कडे जाणारी वाहतूक तसेच गोयल टॉकीज कडुन कामठी रेल्वे स्टेशन कडे जाणारी वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यावर प्रतिबंध व्हावा करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**कामठी रेल्वे स्टेशन कडुन गोयल टॉकीज कडे जाणारी वाहतूक तसेच गोयल टॉकीज कडुन रेल्वे स्टेशन कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- कामठी रेल्वे स्टेशन कडुन गोयल टॉकीज कडे जाणारी वाहतूक कामठी रोड येथुन डावे वळण घेवुन पिलर नं. 2CP316 येथुन उजवे वळण घेवुन सोयीनुसार जाईल.
- गोयल टॉकीज कडुन रेल्वे स्टेशन कडे जाणारी वाहतूक कामठी रोड येथुन डावे वळण घेवुन पिलर नं. 2P320 येथुन उजवे वळण घेवुन सोयीनुसार जाईल.

**सदर अधिसूचना दिनांक ०६.०९.२०२६ ते दि. ०५.१०.२०२६ पर्यंत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी वरील कार्यक्रमाचे वेळेनुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—

( **आदित्य मिरखेलकर, भापोसे** )
पोलीस उप आयुक्त,वाहतुक,
नागपूर शहर